पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४८४ दिनांक - ०२/०६/२०२३**

## हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## हडपसर पोलीसांकडून एका आठवड्यामध्ये ८ रॉबरीसह ९ गुन्हे उघड.
## १० आरोपी आणि ३ विधीसंघर्षित बालकांच्या ४ टोळ्यांचा समावेश.
## रेकॉर्डवरिल गुन्हेगारांना मोका लावणार

हडपसर – ५, विमानतळ – २, येरवडा – १, अशा ८ जबरी चो-या

१) हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं ६०१/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ ( दिनांक २०/०४/२०२३)
२) हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं ९०२/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ ( दिनांक २०/०६/२०२३)
३) हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं ९११/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ ( दिनांक २१/०६/२०२३)
४) हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं ९२७/२०२३ भा.दं.वि.कलम ३९४,३५२,३४ ( दिनांक २४/०६/२०२३)
५) हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं ९४१/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,४२७,३४,५०६ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३,७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम ३७(१)(३) सह १३५ ( दिनांक २८/०६/२०२३)
६) विमानतळ पोलीस ठाणे गु.र.नं ३०८/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ (दिनांक २१/०६/२०२३ रोजी जबरी चोरीच्या लागोपाठ दोन घटना
७) येरवडा पोलीस ठाणेस गु.र.नं ४३१/२०२३ भा.दं.वि.कलम ३९४,३४ (दिनांक २७/०६/२०२३)
८) रांजगणगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ३४८/२०२३ भा.दं.वि.कलम ३७९,३४ (दिनांक १८/०६/२०२३)

**अ) दि. २०/०६/२०२३** रोजी सकाळी ०८/०० वा. फिर्यादी ह्या राहते घराजवळ वॉकींग करून परत घरी आले असता पार्कीगमध्ये एका मोटारसायकल वर तीन अनोळखी लोकांनी त्यांचे जवळ येवून त्यांना पत्ता विचारण्याचा बहाणा करुन त्यांचे गळयातील सोन्याची मनीमाळ जबरदस्तीने हिसकावुन चोरुन नेल्याने हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं ९०२/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे तपासात तपास पथक प्रमुख सपोनिरी विजयकुमार शिंदे, पोउपनिरी अविनाश शिंदे, अंमलदार भगवान हंबर्डे, अनिरूध्द सोनवणे, मनोज सुरवसे, अमोल दणके, शाहीद शेख, कुंडलीक केसकर हे करीत असताना, तपास पथक टिमने आरोपी आलेल्या मार्गाचे सीसीटीव्ही फुटेज मांजरी ते यवत तसेच परत यवत ते मंगळवार पेठ पर्यंतचे ४५० हून अधिक फुटेज तपासून आरोपींचा मार्ग निश्चीत केला. तपासपथकातील अंमलदार भगवान हंबर्डे, अनिरूध्द सोनवणे यांना गोपनीय माहीती मिळाली की, संशयीत आरोपी हा मंगळवार पेठ या भागातील राहण्यास आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचून आरोपी नामे १) स्वप्नील ईश्वर केंदळे वय ३० वर्षे रा. संभाजीनगर नेवासा जिल्हा अहमदनगर सध्या १८६ मंगळवार पेठ पुणे यास ताब्यात घेतले. त्याचेकडे केले तपासात त्याने त्याचे साथीदार २) अमोल भास्कर शेलार रा मुकींदपुर, नेवासा जिल्हा अहमदनगर पाहीजे आरोपी ३) अमर चिरू कांबळे रा. सदर यांचे सोबत हडपसर, विमानतळ, या पोलीस ठाणे हद्दीत चैनचोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपी यांनी चोरून नेलेले सोन्याचे दागिने हे आरोपी ४) विजय रामकृष्ण देडगावकर वय ६३ वर्षे रा. कोल्हार अहमनगर राहता यास विकले असल्याने त्यास गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. तपासा दरम्यान आरोपींकडून १) हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं ९०२/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ २) हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं ६०१/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ ३) विमानतळ पोलीस ठाणे गु.र.नं ३०८/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ यामध्ये दोन ठिकाणी चैन चोरी असे गुन्हे उघड झाले आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे हे करीत आहेत.

**ब) जबरी चोरीच्या दोन घटनांमध्ये** १) दिनांक २१/०६/२०२३ रोजी सायंकाळी १७.३० ते १८.१५ दरम्यान मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसमांनी विन्टेक्स व्हिस्टा सोसायटी रोड, मांजरी याठीकाणी फिर्यादीच्या पाठीमागुन येवुन त्यांची पर्स जबरदस्तीने खेचुन निघून गेले होते. त्याबाबत हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं ९११/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ प्रमााणे गुन्हा दाखल करण्यात आला. २) दि.२४/०६/२०२३ रोजी रात्री ०२/१० वा.चे सुमारास फिर्यादी व त्यांचे मित्र असे तिघेजण बजाज शोरुमचे समोरील रोडवर हडपसर पुणे या ठिकाणी बसची वाट पाहत बसले असताना दोन दुचाकीवरील आलेल्या इमसांनी फिर्यादी यांचे हातावर धारदार हत्याराने जोरात फटाका मारुन त्यांचे डावे हाताला दुखापत करुन फिर्यादी व त्यांचे मित्र यांचे मोबाईल व रोख रक्कम जबरदस्तीने घेवुन गेले होते. त्याबाबत हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं ९२७/२०२३ भा.दं.वि.कलम ३९४,३५२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

दाखल दोन्ही गुन्ह्यांचा तपास तपास पथक अधिकारी आणि अंमलदार हे करीत असताना सपोनिरी विजयकुमार शिंदे आणि पोलीस अंमलदार संदीप राठोड यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषण आधारे, हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं ९११/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४ मधिल आरोपी १) अजय युसुफ मौजन वय २० वर्ष रा. गोकुळ पार्क, केसनंद गाव, पुणे २) यतीन ऊर्फ यत्या उदय पाटील वय २१ वर्ष रा. कोंढापूरी गाव, ता. शिरूर जिल्हा पुणे यांना रांजगणगाव येथून ताब्यात घेतले. त्यांचेकडे केले तपासात त्यांनी गुन्हा केल्याचे कबुली देवून गुन्हा करताना वापरलेली लाल रंगाची यामाहा मोटारसायकल ही रांजणगाव येथून चोरून आणल्याचे निष्पन्न झाले असून त्याबाबत रांजगणगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ३४८/२०२३ भा.दं.वि.कलम ३७९,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. आरोपींकडून दोन मोबाईल, एक यामाहा मोटारसायकल असा किं.रू १,२०,०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**क) हडपसर पोलीस ठाणेस** गु.र.नं ९२७/२०२३ भा.दं.वि.कलम ३९४,३५२,३४ मधिल आरोपी १) अथर्व प्रदीप शेंडगे वय १८ वर्ष रा. चाळ नंबर १००, घर नंबर ०१ म्हसोबा मंदीरच्या बाजुला, पर्वती दर्शन पुणे. २) प्रणव शंकर ढावरे वय १८ वर्ष रा. शिवतेजनगर वाड्याजवळ, अपर इंदिरानगर पुणे. तसेच २ विधीसंघर्षित यांना दत्तवाडी, कोंढवा, बिबवेवडी येथून ताब्यात घेतले. त्यांचेकडे केले तपासात त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. नमुद आरोपींकडे केले तपासात त्यांनी दिनांक २७/०६/२०२३ रोजी पहाटे ०३.३० वा.चे् सुमारास सैनिकवाडी, वडगावशेरी येथे एका इसमास धाक दाखवून त्याचेवर कोयत्याने वार करून त्याची स्प्लेंन्डर मोटारसायकल जबरदस्तीने चोरून आणल्याचे सांगीतले. त्याबाबत येरवडा पोलीस ठाणेस गु.र.नं ४३१/२०२३ भा.दं.वि.कलम ३९४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. आरोपींकडून २ मोबाईल फोन, स्प्लेंन्डर मोटारसायकल, दोन ॲक्टीवा असा किं.रू २,३०,०००/-चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**ड) दिनांक २८/०६/२०२३** रोजी सायकांळी ०६/४० वा सुमारास फिर्यादी हे त्यांचे दुकानात काम करत असताना आरोपी आशुतोष शिवाजी पवार राजिवन बापू चाळ, शेवाळवाडी, गौरव संतोष अडसूळ रा शेवाळवाडी व रवि संभाजी हजारे रा शेवाळवाडी यांनी दुकानातील कॅश काऊंटर तसेच दुकानातील इतर मिठाईचे काऊंटर, चार फ्रिजर, कोल्ड्रींगचे काचा व दुकानातील काचा व दुकानाच्या बाहेर असलेले नाष्टा काऊन्टरच्या काचा हातातील धारदार शास्त्राने फोडून नाष्टा काऊन्टर मधील रोख रक्कम २०००/- रुपये जबरदस्तीने चोरी करुन त्यांच्या हातातील धारदार शस्त्र हे हवेत फिरवून खबरदार कोणी मध्ये आलातर कोणालाही जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवून निघून गेल्याने हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं ९४१/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,४२७,३४,५०६ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३,७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम ३७(१)(३) सह १३५

या गुन्ह्यात खासगी कामासाठी आलेले अंमलदार विजयकुमार ढाकणे यांनी आरोपींचा पाठलाग करून आरोपी १) गौरव संतोष अडसुळे वय १९ वर्ष रा. शेवाळवाडी मांजरी पुणे २) रवी संभाजी हजारे वय १९ वर्ष रा. शेवाळवाडी हडपसर पुणे. ३) नयन उर्फ अभिषेक हरिदास भोसले वय २० वर्ष रा.सदर व १ विधीसंघर्षित बालक यांना अटक / ताब्यात घेण्यात आले आहे.

**अशा प्रकारे हडपसर पोलीस ठाणेकडील तपासपथकाकडून एका आठवड्यामध्ये ८ जबरी चो-या आणि १ वाहनचोरी असे ९ गुन्हे उघडकीस आणून १० आरोपी आणि ३ विधीसंघर्षित बालकांसह ४ टोळ्यांना ताब्यात घेतले आहेत. टोळीतील गुन्हेगारांना मोका कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.**

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त  पुणे शहर श्री रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त पुणे शहर श्री. संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. रंजनकुमार शर्मा व मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५. श्री.विक्रांत देशमुख यांचे मागदर्शनाखाली मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे श्रीमती अश्विनी राख वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर,  श्री. अरविंद गोकुळे पोनि.(गुन्हे) श्री. विश्वास डगळे यांचे सुचनाप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक, विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार, संदीप राठोड, समीर पांडुळे, सचिन जाधव, शाहीद शेख, प्रशांत दुधाळ, निखील पवार, अतुल पंधरकर, भगवान हंबर्डे, अनिरूध्द सोनवणे, सचिन गोरखे, मनोज सुरवसे, अमोल दणके, प्रशांत टोणपे, कुंडलीक केसकर, रशिद शेख, अजित मदने, चंद्रकांत रेजीतवाड यांचे पथकाने करुन प्रशंसनीय कामगिरी केली आहे.

